# पोटगी मागण्यासाठीच्या अर्जामध्ये पुढील मुद्द्यांबद्दलचे तपशील आवश्यक आहेत.

- **ज्या कायद्याअंतर्गत पोटगी मागितली जाते आहे त्या कायद्याचे नाव व कलम क्रमांक**
- **अर्जदाराचे व अज्ञान बालकांचे -**
    - o नाव
    - o वय
    - o व्यवसाय
    - o पत्ता – मोबाईल क्रमांकासहीत (पत्ता पुरावा म्हणून दाखल केलेल्या कागदपत्रानुसार हा पत्ता अचूक असावा)
- **जाब देणाराचे -**
    - o नाव
    - o वय
    - o व्यवसाय
    - o पत्ता
- **विवाह व अपत्यांबाबत तपशील**
    - o विवाहाची दिनांक, वार, स्थळ, कोणत्या धर्ममाच्या रितीरिवाजानुसार विवाह झाला,
    - o मुलांचे जन्मदिनांक, वय, शिक्षण
- **वैवाहीक बेबनाव, विभक्त झाले असल्यास केव्हापासून, काय कारणांनी वगैरे माहिति**
    - o केव्हापासून हिंसाचार होते आहे, काही ठळक घटना,
- **अर्जदाराचे उत्पन्नाचे मार्ग**
    - o स्वतः कमावत असल्यास किती उत्पन्न,
    - o आई-वडील, भाऊ वा इतर नातेवाईकांची मदत घेत असल्यास त्या मदतीचे स्वरूप,
    - o अर्जदाराची सांपत्तीक स्थिती
- **स्वतः अर्जदार व मुली-मुलांच्या उदरनिर्वाहासाठी होणारा मासिक-वार्षिक खर्च**
- **अर्जदारावरील इतर जबाबदा-या**
    - o कर्जाचे हप्ते,
    - o घरभाडे,
    - o औषधपाणी ईत्यादींचा तपशील
- **जाब देणाराचे उत्पन्न**
    - o त्याच्या स्वतः नोकरी व्यवसायातून मिळणारे उत्पन्न्,
    - o कौटुंबिक संपत्तीतून येणारे एकूण मासिक-वार्षिक उत्पन्न,
    - o त्याची इतर सांपत्तीक स्थिती
- **अर्जदाराला स्वतःच्या उत्पन्नातून किती खर्च करणे शक्य होते, नातेवाईकांकडून किती मदत घ्यावी लागते व याचा तपशील**
- **अर्जदार व मुलांना जाब देणाराकडून दरमहा किती रक्कमेची अपेक्षा आहे.**

---------